# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 23/02/2024 (शुक्रवार) दुपार

---

## बस स्टॉपवरून दागिने चोरी करणारे आरोपी नागपूर ग्रामीण पोलीसांच्या जाळयात

दिनांक २२/०२/२०२४ रोजी फिर्यादी नामे– सौ. नयना शेखर मोगरे, वय ३८ वर्ष रा. मुलताई चौक वरूड हिचे जलालखेडा बस स्टॉपवर प्रायव्हेट बसमधून ट्रॉलीबॅगचा ताला तोडून बॅगमध्ये ठेवलेले पाच ग्रॅम सोन्याची पोत किंमती ३००००/– रुपये व दोन ग्रॅम सोन्याची पोत किंमती १२ हजार रुपये व नगदी ३१००/– रुपये असा एकूण ४५ हजार १०० रुपयाचा मुद्देमाल अज्ञात आरोपी यांनी बॅगमधून चोरला असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोस्टे जलालखेडा येथे अप क्र. ७८/२४ कलम ३७९ भांदवि. अन्वये सदर गुन्हा नोंद केला होता.

सदर गुन्हयामधील फरार आरोपींचा शोध करणेकामी सहायक पोलीस निरीक्षक चेतनसिंग चव्हान ठाणेदार पोस्टे जलालखेडा, ग्रेड पोलीस उपनिरीक्षक अनिल जोशी, पोहवा आशिष हिरूळकर, पुरूषोत्तम धोंडे, चालक पोहवा रवि मोहोड, पोशि रविंद्र धुर्वे यांनी कसोशीने शोध घेतला असता मिळालेल्या गोपनीय माहिती नुसार नमुद गुन्हयातील फरार आरोपी नामे– **१) नासिर जम्मा शेख वय ४० वर्ष २) सानू फुल हसन शेख वय २५ वर्ष ३) नवीन खालील अली वय २३ वर्ष ४) शहादत अली रईस अली वय ३० वर्ष ५) सुभान मोहम्मद हुसेन वय २५ वर्ष ६) जुल्फ कार अब्दुल अजीज व ४० वर्ष सर्व राहणार उत्तर प्रदेश** यांना ताब्यात घेवुन त्यांना सदर चोरीचे गुन्हयाबाबत सखोल विचारपुस केली असता उडवाउडवीची उत्तरे दिली. अधिक विचारपुस दरम्यान सदरचा चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यांचेकडुन चोरीस गेलेला नगदी ३१००/– रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन सोन्याचे दागिने जप्त करणे बाकी आहे. गुन्हयाचा पुढील तपास ग्रेड पोलीस उपनिरीक्षक अनिल जोशी हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण नागपूर श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक चेतनसिंग चव्हान ठाणेदार पोस्टे जलालखेडा, ग्रेड पोलीस उपनिरीक्षक अनिल जोशी, पोहवा आशिष हिरूळकर, पुरूषोत्तम धोंडे, चालक पोहवा रवि मोहोड, पोशि रविंद्र धुर्वे यांनी केली.

## अवैधरीत्या घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस नागपूर ग्रामीण पोलीसांनी केले अटक

**पोस्टे खापरखेडा:–** अंतर्गत कुचक मोहल्ल्ला पिपळा डाग बंगला येथे दिनांक २२/०२/२०२४ चे २२.३० वा. ते २३.१०. वा. दरम्यान खापरखेडा पोलीस पथकास गोपनीय माहिती मिळाली की, एक इसम कुचक मोहल्ला पिपळा डाग बंगला येथे सार्वजनिक ठिकाणी आमरस्त्यावर चाकुसारखे घातक शस्त्र घेऊन फिरत आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून नमुद घटनास्थळी खापरखेडा पोलीसांनी पोहचुन **आरोपी नामे– विकेश उर्फे विक्की देवीदास चंद्रीकापुरे, वय ३५ वर्ष, रा. कुचक मोहल्ला पिपळा डाग बंगला** हा कुचक मोहोल्ला पिपळा डाग बंगला येथे सार्वजनिक ठिकाणी आमरस्त्यावर चाकु घेऊन फिरतांनी मिळुन आल्याने त्याचे ताब्यातुन एक लोखंडी चाकु अंदाजे किंमती १००/– रु. चा मिळुन आल्याने गुन्हयात जप्त करून आरोपीस ताब्यात घेतले.

सदरची कार्यवाही ही श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण नागपूर श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन खापरखेडा येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक धनाजी जळक, पोहवा शैलेश यादव, प्रफुल राठोड, पोना मुकेश वाघाडे, प्रदीप मने, राजू भोयर, कविता लोखंडे डीबी पथकाने केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर